क्रमांक : ६५

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

### सोमवार, दिनांक ११ जून, २०१८/ ज्येष्ठ,२१ १९४० शके

८३. लक्षवेधी सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की :-

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या बुधवार, दिनांक ४ जुलै, २०१८ पासून विधान भवन, नागपूर येथे सुरु होणाऱ्या सन २०१८ च्या व्दितीय (पावसाळी) अधिवेशनासाठी द्यावयाच्या लक्षवेधी सूचना पूर्णत: एम.ओ.आय.एस. (**MOIS**) या संगणक प्रणालीवर ऑनलाईन (**ONLINE**) पध्दतीने गुरुवार, दिनांक २८ जून, २०१८ पासून सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

(२) ऑनलाईन (**ONLINE**) पध्दतीने प्राप्त होणाऱ्या लक्षवेधी सूचनांना संगणकीय प्रणालीव्दारे आपोआपच अनुक्रमाने नोंदणी क्रमांक दिला जाईल.

(३) महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबंधित असणे आवश्यक आहे.

(४) अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण ३ दिवस अगोदरचा दिवस हा ऑनलाईन (**ONLINE**) पध्दतीने लक्षवेधी सूचना स्विकारण्यासाठी अंतिम दिवस असेल.

(५) लक्षवेधी सूचना स्वीकृत करण्यासंबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार हा मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचाच राहील याची कृपया नोंद घेण्यात यावी.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ११ जून, २०१८.

डॉ.अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

प्रति :

(१) महाराष्ट्र विधानरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) मा.सभापती व मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव/खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(३) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
(५) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालय.
(७) मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(८) संगणक कक्ष **(WEBSITE)**
(९) एम.के.सी.एल.कक्ष **(MKCL)**